Shivaji College of Arts Hingoli

120

# Vidyawarta®

International Multilingual Research Journal
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed Pin-431126 (Maharashtra)

ISO 9001-2015 CERTIFIED

## Certificate Of Publication

This is to certify that the review board of our research journal accepted the research paper/article titled आधुनिक मराठी कवितेच्या जनक-सावित्रीबाई फुले of Dr./Mr./Miss/Mrs. मुंढे संगीता नारायणराव

It is peer reviewed and published in the Issue 42 Vol. 07 in the month of April to June 2022.

Thank you for sending your valuable writing for Vidyawarta Journal

Indexed (IIJIF) | Impact Factor 8.14 | Govt.of India, Trade Marks Registry Regd.No.2611690

ISSN-2319 9318

Editor in chief
Dr.Bapu G.Gholap

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

www.vidyawarta.com

Shivaji College of Art's Hingoli

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता

April To June 2022
Issue 42, Vol-07

Date of Publication
01 May 2022

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

**विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली**
**नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले**
**वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले**

**-महात्मा ज्योतीराव फुले**

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli (MS)

Shivaji College Hingoli



14) MYXOMYCETOUS BIODIVERSITY OF PATNA DEVI FOREST DIST. JALGAON....
**Chimankar N.V., Bhadgaon Dist. - Jalgaon.** ||57

15) Digital Governance a bridge to Global Rise of Incredible India: An Analysis
**Ashish Alok, Nimisha Sinha, Ranchi, Jharkhand** ||61

16) Standardization of Morphological and Skill Related Physical Fitness Tests....
**Asst. Prof. Pallavi Tarde, Dr. Abhijit More, Dr. Deepak Shendkar, Pune** ||67

17) भारतीय स्वातंत्र्यांचा अमृतमहोत्सव : सन १९५२ ते २०१९ लोकसभा निवडणुकांचे सिंहावलोकन
**डॉ. दिलीपकुमार दगडु क्षीरसागर, औसा जि.लातूर** ||73

18) ई कचरा - जागतिक पर्यावरण सुरक्षेपुढिल आव्हान
**डॉ. गिरिश जोम्सू गावित, थाळनेर, ता. शिरपुर जि. धुळे** ||78

19) संत तुकाराम व त्यांचा वर्गव्यवस्थे विरूध्द् लढा
**प्रा. मनोज देवराव महल्ले** ||81

20) ग्रामिण भागातील महिला सक्षमिकरणामुळे महिला बचत गटाचे योगदानाविषयी अभ्यास
**डॉ. कल्पना एम.बंडिवार, वर्धा** ||84

21) आधुनिक मराठी कवितेच्या जनक— सावित्रीबाई फुले
**प्रा. डॉ. संगीता मुंढे, हिंगोली.** ||86

22) महाराष्ट्रातील प्राथमिक कृषी पतसंस्थांच्या ग्रामीण विकासातील योगदानाचा अभ्यास
**डॉ. गोपीनाथ साहेबराव बोत्रे, लोणी काळभोर** ||91

23) भारतीय अर्थव्यवस्थेतील चलनवाढीचे अर्थकारण
**प्रा. डॉ.ए.जी. मगदूम, जि. कोल्हापूर** ||93

24) एकोणिसाव्या शतकातील स्त्री जीवनातील स्थित्यंतरे
**सहा. प्रा.डॉ. सारिका अशोकराव बुरगे, केज, जिल्हा बीड** ||97

25) बीमा के प्रति परम्परागत और आधुनिक दृष्टिकोण एवं ग्रामीण व शहरी भारतीयों...
**श्रीमती मोनिका खदरिया, नोहर, जिला हनुमानगढ़ (राजस्थान)** ||104

26) वीर काव्य के संदर्भ में रामधारी सिंह 'दिनकर' की काव्य कृति 'कुरूक्षेत्र' : एक अध्ययन
**डॉ. पुष्पराज लाजरस, पाली, जिला कोरबा (छ.ग.)** ||108

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

123

प्रस्तुत संशोधनात महिला सक्षमीकरणामध्ये ग्रामीण भागातील महिला बचत गटाचे योगदान विषय असल्यामुळे प्रत्यक्ष अभ्यास महत्वाचा आहे. त्यामुळे त्या संकलणासाठी प्राथमीक स्त्रीयाच्या माधमातून मुलाखत अनुसुची तंत्राचा वापर करण्यात आले.

**ब) दुय्यक संशोधन :—**

संशोधन वेगळया तत्वावर आधारे तथ्य संकलन कते अशा विश्लेशणाच्या आधारे गुणातमक तथ्याचे सांख्यीकीय व वस्तुनिष्ठ तत्वात रूपांतर केले जाते असे विश्लेशणानंतर निष्कर्ष काढ जातात.

प्रस्तुत संशोधनामध्ये तत्वाचे अहोन करण्यासाठी तत्वाच्या गुणधर्मानूसार प्राप्त होणारे नाही. म्हणून प्रस्तुत संशोनात अशच विश्लेशणाचा अयोग्य करण्यात आला आहे.

**निकर्ष :—**

प्रस्तुत संशोधनामध्ये काही इहक निष्कर्ष काढयात आले जे संशोधनामधील महिला बचत गटाचे योगदान दर्शवितात महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांमध्ये सक्षमीकरण करण्यात आले गटाच्या माध यमातुन दिल्या जाणा—या प्रशीकरण्याचा आत्मविश्वास वाढल्या असल्याचे दिसुन येते. बचत गटाच्या महिलासाठी शासनाकडुन अल्पमुदत निवासमुळे सोयी सुवीधा पुरविल्या जातात तसेच बचत गटाअंतर्गत महिलांना शीवणकाम प्रशीक्षण दिल्या जातात बचत गटाच्या माध्यमातून महिलांचा विकास होण्यात मदत झाली आहे.

**संदर्भ :—**

१) प्रा. एम.यु.मुलाणी (महिला स्वय सहायता बचत गट डायमंड पब्लीकेशन, पुणे २०१८)
२) डॉ. प्रविण एल. वानखेडे (महिला स्वय सहायता बचत गट आणि सक्षमीकरण, सीवाली प्रकाशन नागपूर)
३) डॉ. आमलये प्रदीप (२०००), सामाजिक संशोधन पध्दती शास्त्र व तंत्र नागपूर विद्यापीठ प्रकाशन
४) डॉ. देशपांडे एक.व्ही. (१९१८) स्त्री विषयक माहिती, पूणे पब्लीकेशन
५) अन्सारी प्रा.एम.ए. (२००१) राष्ट्रीय महिला आयोग व भारतीय नारी

**21**

# आधुनिक मराठी कवितेच्या जनक— सावित्रीबाई फुले

**प्रा. डॉ. संगीता मुंढे**
मराठी विभाग
शिवाजी महाविद्यालय, हिंगोली.

**********

**प्रस्तावना—**

पहिल्या शिक्षिका, पहिल्या मुख्याध्यापिका म्हणून आपण सावित्रीबाई फुले यांना ओळखतो. सावित्रीबाई आणि महात्मा ज्योतिबा फुले यांनी केलेले सामाजिक आणि शैक्षणिक कार्य म्हणजे त्या काळातील क्रांतीच होती. संपूर्ण आयुष्य या उभयतांनी समाजासाठी व स्त्री शिक्षणासाठी वेचले. सामाजिक कार्यासाठी प्रसंगी त्यांनी घरही सोडले, आर्थिक विपन्नावस्था भोगलीय पण हाती घेतलेल्याकार्यापासून मागे हटले नाहीत. त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा काढली, महिला सेवा मंडळाची स्थापना, बाल हत्या प्रतिबंधक गृह, सत्यशोधक समाजाची स्थापना, दुष्काळ निर्मूलन कॅम्प, मुलांचे वस्तीगृह इत्यादी महत्त्वाची सामाजिक कार्य या दाम्पत्याने केली. याशिवाय इतरही अनेक समाजोपयोगी कामे त्यांनी केली. सावित्रीबाई फुले यांनी आपले पती ज्योतिबा फुले यांना त्यांच्या कार्यात मोलाचे सहकार्य केले. नारायण महादेव ऊर्फ मामा परमानंद त्यांच्याविषयी म्हणतात, ''महात्मा ज्योतिराव फुले आणि त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले हे देशाच्या सामाजिक आणि शैक्षणिक इतिहासातले एक आगळेवेगळे जोडपे होते.''[१]

पहिल्या शिक्षिका, पहिल्या मुख्याध्यापिका म्हणून आपण सावित्रीबाईंना ओळखतो. त्यांचे कार्य जाणतोय पण त्या उत्तम कवयित्री होत्या, चांगल्या वक्त्या होत्या हे खूप जणांना माहिती नाही. सावित्रीबाईंना शिक्षणाचे धडे त्यांचे पति महात्मा ज्योतिबा फुले यांनी दिलेय पण सावित्रीबाई या स्वतंत्र विचाराच्या, सामाजिक

कार्याची मुळातच आवड, आस्ता असणाऱ्या मातृहृदयी होत्या. हे त्यांच्या काव्यातून दिसून येते. सावित्रीबाईंच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक पैलू आपल्याला त्यांच्या लेखनातून दिसून येतात. त्यांनी मोजकेच लेखन केले. त्यात 'काव्यफुले' आणि 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हे दोन कवितासंग्रह आहेत. त्याबरोबरच 'ज्योतिबांचीभाषणे' हे पुस्तक त्यांनी संपादित केले आहे. सावित्रीबाईंनी ज्योतिबांना लिहिलेली तीन पत्रे आहेत. तसेच सावित्रीबाईंनी वेळ प्रसंगी समाज प्रबोधनासाठी केलेली भाषणे 'मातोश्री सावित्रीबाईंची भाषणे' या पुस्तकात नारो बाबाजी पानसरे पाटील यांनी १९९२ साली संपादित केलीआहेत.या सर्व लेखनातून सावित्रीबाई फुले यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रकाश पडतो. एक कवयित्री म्हणून असलेले त्यांचे वेगळेपण लक्षात येते.

विषयविवेचन—सावित्रीबाईंच्या कवितेचा कालखंड हा आद्यकवी केशवसुतांच्या कवितेच्या आधीचा आहे. 'काव्यफुले' हा त्यांचा कवितासंग्रह १९५४ साली शिळा प्रेसवर प्रकाशित झाला. यावेळी सावित्रीबाई या अवघ्या तेवीस वर्षाच्या होत्या. कोणतीही काव्याची पूर्वपरंपरा त्यांना नव्हती. तर दुसरीकडे त्यांचे सामाजिक कार्य सुरूच होते. अशा वेळेला आपल्या मनातील भावना, विचार त्यांनी काव्यातून व्यक्त केले आहेत. या काव्यसंग्रहात एकूण ४१कविता आहेत. त्यात निसर्ग विषयक, सामाजिक, प्रार्थनापर, आत्मपर, काव्यविषयक, बोधपर, इतिहास विषयक आणि स्फुट स्वरूपाच्या अशा विविध विषयावरील कविता आहेत. प्रास्ताविकामध्ये कवयित्रीचे मनोगत आहे. त्यानंतर अर्पण पत्रिका आहे. यालाच त्यांनी 'अर्पणिका' असे म्हटले आहे. हा कवितासंग्रह कवयित्रीने वाचकांना अर्पण केला आहे. यातून त्यांचे वेगळेपण जाणवते. सुरुवातीच्या कविता या शिवप्रार्थना, शिवस्तोत्र आणि ईशस्तवन करणाऱ्या आहेत. यातून शंकराचा महिमा वर्णन केला आहे. त्या शंकराला निर्मिक म्हणतात. बालपणी मनावर झालेले परंपरेचे, धार्मिक वृत्तीचे संस्कार यातून पाहायला मिळतात.

'छत्रपती शिवाजी' आणि 'राणी छत्रपती ताराबाई' या ऐतिहासिक कविता त्यांनी लिहिल्या आहेत. राणी ताराबाई यांचे चरित्र त्यांनी अभ्यासले असावे हे कविता वाचताना लक्षात येते. अतिशय प्रतिकूल परिस्थितीत मोगलांशी मोठ्या जिद्दीने ताराबाईंनी जो लढा दिला त्याला इतिहासात तोड नाही. या लढवय्या ताराबाईला क्रांतीज्योती सावित्रीने केलेला हा काव्यरूपी मुजरा आहे असे म्हणावे लागेल. त्या या कवितेत म्हणतात, '

''ताराबाई माझी मर्दानी
भासे चंडिका रणांगणी
रणदेवा ती श्रद्धास्थानी
नमन माझियेतिचियाचरणी.''

यातून एका स्त्रीचं कार्यकर्तृत्व पुन्हा समाजापुढे ठेवणं हाही उद्देश त्या काळाच्या संदर्भात असू शकतो. कारण स्त्रीला सर्वच दृष्टीने बंदिस्त करणाऱ्या त्या काळाच्या संदर्भात एका ऐतिहासिक स्त्री पात्राचे कर्तृत्व समाजापुढे मांडून स्त्रीचं कर्तृत्व ताराबाई सिद्ध करू इच्छितात असे वाटते. 'छत्रपती शिवाजी' या कवितेतून कुळवाडीभूषण, रयतेचा राजा छत्रपती शिवाजी महाराजांची थोरवी वर्णन केली आहे.

'काव्यफुले' या काव्यसंग्रहात सावित्रीबाई फुले यांनी काही निखळ निसर्ग वर्णनपर कविता केल्या आहेत.'पिवळा चाफा','जाईचे फूल','जाईची कळी','गुलाबाचेफुल'', 'फुलपाखरू' व 'फुलांची कळी', 'मानव व सृष्टी','मातीची ओवी'ई. कविता या प्रकारच्या आहेत. यातून बालपणी अनुभवलेले अनुभवविश्व साकारले आहे असे म्हणावे लागेल. निसर्ग वर्णन करताना त्या निसर्गाशी असलेले मानवाचे नाते प्रस्थापित करतात.

'पिवळा चाफारंग हळदीचा
फुलला होता हृदयीबसतो
नाव तयाचे सुवर्ण चंपक
सृष्टी दागिना मनास पटतो.''

यातून पिवळ्या चाफ्याचे सौंदर्य तर वर्णन केले आहेचय पण त्याबरोबरच मानवी जीवनाशी निसर्गाचे असलेले साधर्म्यही दाखविले आहे. 'जाईचेफूल' या कवितेत मानव आणि जाईच्या फुलाच्या आनंदी जीवनाचे वर्णन आले आहेय पण त्याचबरोबर मानवी स्वार्थी प्रवृत्तीचेही दर्शन घडविले आहे.

''रीत जगाची कार्य झाल्यावर
फेकून देई मजला हुंगून''



125

Shivaji College Hingoli

होतील अशाही काही कविता रचल्या आहेत. त्यात 'बाळास उपदेश','नवस','इंग्रजी शिका','शिकण्यासाठी जागे व्हा','बोलकी बाहुली','अज्ञान' इत्यादी कवितांचा समावेश होतो.'काव्यफुले' या कवितासंग्रहातील शेवटची कविता 'सावित्रीबाई ज्योतिबा संवाद' ही आहे. यातून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या कार्याचा परिचय देऊन, या कार्यात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. डॉ. कृं.प. देशपांडे त्यांच्या कवितेबद्दल म्हणतात,''त्यात आकाशाला गवसणी घालण्याचे सामर्थ्य नसेल, विद्युलता त्याची चमक नसेल किंवा समुद्राची अथांगता ही नसेल, परंतु त्यात देवघरात शांत तेवत राहणाऱ्या नंदादीपाची सौम्यता, शुचिता आणि निरंतर झुळझुळणार्याद निर्झरिणीचे सौंदर्य निश्चित आहे.''[२] यातून त्यांच्या कार्याचे मोल लक्षात येते. काव्य दृष्टीने या कवितांचे मोल कमी असले तरी सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्टीने या कविताखूपच मोलाच्या आहेत.

'काव्यफुले' नंतर सावित्रीबाईंचा दुसरा कवितासंग्रह म्हणजे 'बावनकशी सुबोध रत्नाकर' हा होय. हे एक दीर्घकाव्य आहे. हे काव्य १८९२ साली प्रकाशित झाले. कृपं. देशपांडे यांच्या मते, इ.स. १८९१ साली रचलेल्या आणि ७ नोव्हेंबर १८९२ साली प्रकाशित झालेल्या या काव्याचे प्रकाशक नारोबाशास्त्री महाघट हे असून अमरावती जिल्ह्यातील करंजगाव येथे सत्यशोधक समाजाचे स्वामी लक्ष्मण शास्त्री सोनार यांच्या घरी हे प्रसिद्ध केले."[३] बावन्नकशी सुबोध रत्नाकर' हे काव्य सावित्रीबाईनी ज्योतिबा गेल्यानंतरच्या काळात रचले आहे. हे काव्य त्यांनी ज्योतीबानाच अर्पण केले आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा या काव्यात सावित्रीबाईनी घेतला आहे. जी. ए. उगले यांच्या मते,''छान गाणे (गोष्टी) रचावे असाया काव्यरचन्या मागचा हेतू असल्याचे सावित्रीबाईनी म्हटले असले तरी, एवढ्या मर्यादित हेतूने हे काव्य रचले गेले नाही, तर उलट कुळाची कथा, भारताचा राजकीय, सामाजिक गुलामीचा इतिहास, जोतीरावांच्या क्रांती कार्याचा धावता आढावा व त्यातून भक्तिभावाने जोतिबांचे स्मरण करावे आदी उद्दिष्टे हे काव्य रचण्यामागे आहेत.''[४] हे काव्य १८९१ साली रचले असले तरी, ते सावित्रीबाईच्या मनात अनेक दिवस घोळत असले पाहिजे असे दिसते. या दीर्घ काव्याची रचना सहा भागात करण्यात आली आहे. उपोद्घात म्हणजे मनोगत,सिद्धता, पेशवाई, आग्लाई, ज्योतिबा, आणि उपसंहार असे ते सहा भाग आहेत. मनोगतामंतर, सिद्धता या भागात आर्यांच्या आगमनापासून थेट कुळवाडीभूषण शिवाजीराजांच्या कारकिर्दीचा आढावा घेतला आहे. या भागात एकूण बारा कडवी आहेत.

''म्हणोनी शिवाजी स्वराज्या उभारी
समाजी अतीशूद्र लोकासतारी
मनुष्या आणि सुखी ठेव त्यांना
परी शिवसत्ता पुढे लाभली ना.''

सामान्य माणसाचे राज्य शिवाजीने आणले, मात्र ही शिवसत्ता जास्त काळ लाभली नाही, ही खंत सावित्रीबाई व्यक्त करतात. पुढे पेशवाई या भागात पेशवाईच्या काळात स्त्री शुद्रादिकावरील अन्याय, अत्याचारात जी वाढ झाली, चातुर्वण्य व्यवस्था आणखी खडक झाली त्या गुलामगिरीच्या इतिहासावर प्रकाश टाकला आहे. पुढे आग्लाई या भागांमध्ये इंग्रजी सत्ता आल्यानंतर सामान्य माणसाच्या जीवनात जो बदल झाला, त्याचे वर्णन केले आहे. इंग्रजांच्या आगमनामुळे सर्वांना विद्येची द्वारे खुली झाली. त्यामुळे त्या इंग्रजी सत्तेचे स्वागत करतात. त्यानंतर ज्योतिबा या भागांमध्ये महात्मा फुले यांच्या सामाजिक क्रांतीकारी कार्याचा आढावा घेतला आहे.

''निराधार दुःखी स्त्रियांचा पुढारी
दुबळया आडाणी जनांचा मदारी
कृती तैसाखरज्ञानयोगी
स्त्री—शुद्राकरीताइही दुःख भोगी.''

अशा पद्धतीने ज्योतीबांच्या कार्यावर प्रकाश टाकला आहे. या भागाचा मुख्य हेतू म्हणजे ज्योतिबाचे स्मरण करणे व त्यांच्या कार्याची ओळख पुढच्या पिढीला करून देणे हा आहे. या भागाविषयी जी. ए. उगले म्हणतात, ''मुळातच दुःखितांचे दुःख दूर करावे हा पिंड असलेल्या सावित्रीबाईनी, आकाशाला गवसणी घालणाऱ्या पतीच्या निधनानंतर, एकाकी झालेल्या सावित्रीबाईनी अंतरीच्या बोलांना पोटतिडकीने मोकळी वाट करून दिली आहे.''[५]

अशा पद्धतीने हे दोन्ही कवितासंग्रह तत्कालीन

Shivaji College Hingoli

निसर्गाचे मानवी जीवनाशी तादात्म्य दाखविले आहे. निसर्ग वर्णन करताना त्या मानवतावादाकडे झुकतात. 'ब्रम्हवंती शेती' या कवितेत कवयित्रीने शेतीचा संबंध ज्ञानाशी जोडला आहे.

''जेकरिती शेती विद्या संपादिती
तया ज्ञानवंती सुखी करी''

म्हणजे शेतकऱ्यांनी शेती करत करत ज्ञान संपादन केले तर, त्याला अधिक सुख मिळेल, तो सुखी होईल असे त्या म्हणतात. मुळात सावित्रीबाईचा पिंड हा सामाजिक कार्यकर्त्याचा आहे. त्यामुळे आपल्या आजूबाजूला जे काही समाज दर्शन होते त्यातील अन्यायकारक बाबीवर त्यांची लेखणी चालते. अनिष्ट प्रथा,परंपरा, अंधश्रद्धा यावर त्या हल्ला करतात. जर स्त्री, शुद्रादिकांची प्रगती करावयाची असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही असे त्यांना वाटते. 'मनूम्हणे','श्रेष्ठधन','नवस','शुद्र शब्दांचा अर्थ', 'इंग्रजीशिका','शिकण्यासाठी जागे व्हा','शूद्रांचे परावलंबन','तयास मानव म्हणावे का?,''इंग्रजी माऊली','अज्ञान','सावित्रीव ज्योतिबा संवाद' इ. कवितातून त्यांनी दलित बहुजन समाजाला मौलाचा संदेश दिला आहे. त्यांचे प्रबोधन केले आहे. 'मनूम्हणे,' या कवितेतून मनू हा कसा विषमताधिष्ठित समाजरचनेचा प्रमुख आहे, ते सांगून आपण आपले स्वत्व जपले पाहिजे असे त्या सांगतात. 'श्रेष्ठ धन' या कवितेतून फुले दाम्पत्याने शिक्षणासाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतला आहे. 'इंग्रजी माऊली' या कवितेतून इंग्रजांच्या आगमनामुळे सामान्यांच्या जीवनात जे अनुकूल बदल घडून आले, शिक्षणाचे दरवाजे सर्वांसाठी खुले झाले, त्यामुळे त्यांच्या प्रगतीला सुरुवात झाली त्याचे वर्णन केले आहे. म्हणून त्या इंग्रजी सत्तेला 'इंग्रजी माऊली' असे म्हणतात. कारण आपल्या स्वकीया प्रमाणे इंग्रजांनी केवळ स्त्री — शुद्रांचे शोषण केले नाही,तर त्यांनामाणूस म्हणूनसमानतेची वागणूक दिली.

''इंग्रजी माऊलीशूद्रांना पान्हा पाजी
संगोपन आजी करतसे
इंग्रजी माऊली तोडते पशुत्व
देई मनुष्यत्व शूद्रलोका''

त्यांना इंग्रज हे माऊली प्रमाणे वाटतात. कारण त्यांनी शूद्रांना माणूस म्हणून वागणूक दिली, शिक्षण दिले. 'नवस' या कवितेतून कवयित्रीने अंधश्रद्धेवर हल्ला केला आहे. अज्ञान आणि अंध: श्रद्धेमुळे येथल्या दिन दलितांची ही अवस्था झाली आहे असे त्यांना वाटते. म्हणून संत तुकारामाप्रमाणे अंध:श्रद्धेवर त्या कठोर प्रहार करतात.

''गोट्याला शेंदूर फासुनि तेलात
वसती देवात दगड तो
धोंडे मुले देती नवसा पावती
लग्न का करती नारी—नर.''

अशा पद्धतीने प्रश्न विचारून अंधश्रद्धेला मूठमाती देण्याची विनवणी त्या करतात. 'शिकण्यासाठी जागे व्हा' या कवितेतून त्यांनी शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. समाजाचा संपूर्ण विकास व्हावयाचा असेल तर, शिक्षणाशिवाय पर्याय नाहीअसे त्या म्हणतात.

''असे गर्जुनी विद्या शिकण्या जागे होऊनी
झटा परंपरेच्या बेड्या तोडून शिकण्यासाठी उठा''

'तयास मानव म्हणावे का?' ही बाराकडव्यांची कविता नैतिक मूल्य शिकवणारी आहे. नैतिक मूल्यांचेजे अध:पतन करतात, नैतिक मूल्यांच्या विरोधी वर्तन जे करतात, त्यांना मानव म्हणावे का? असा प्रश्न सावित्रीबाईंनी विचारला आहे.

''बाईल काम करीत राही
ऐतोबा हा खात राही
पशू पक्षात ऐसे नाही
तयास मानव म्हणावे का?''

यातून स्त्री—पुरुष समानतेचे तत्त्व मांडले आहे. मानव सोडला तर इतर पशू पक्षात असा भेदभाव नाही असे सावित्रीबाई म्हणतात.

''गुलामगिरीचे दु:ख नाही
जराही त्यास जाणवत नाही
माणुसकीही समजत नाही
तयास मानव म्हणावे का?''

अशा पद्धतीने संवेदनाहीन, माणुसकीपासून फारकत घेतलेल्या व्यक्तीला प्रश्न विचारला आहे, अशांना माणूस म्हणावे का? असे सावित्रीबाई म्हणतात. साध्या सोप्या भाषेत मानवी मूल्यावर, मानवी जीवनावर ही कविता भाष्य करते. सावित्रीबाईंनी विद्यार्थ्यांना उपयुक्त

समाजजीवनाचे, सांस्कृतिक जीवनाचे दर्शन घडविण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. काव्य गुणाच्या दृष्टीने जरी ते कमी असले तरी ज्या भूमिकेतून सावित्रीबाईंनी हे काव्य रचले आहे ती भूमिका महत्त्वाची आहे. हे काव्य रचताना त्यांना काव्याची कसलीही पूर्व परंपरा नव्हती, समकालीन कोणी कवयित्री नव्हती. केवळ आंतरिक उर्मीतून निर्माण झालेली ही कविता म्हणूनच सहज सुंदर आहे. या कवितेविषयी जी.ए.उगले म्हणतात, 'हे काव्य क्वचित प्रसंगी प्रौढ, भारदस्त भासत नसले तरीही अर्वाचीन मराठी काव्य विश्वातील एका कवयित्रीचा हा प्रयोग मोलाचा आहे. शेतकरी कन्येचे हे भावविश्व कविता वाचताना लक्षात येते. सरळ सोप्या शब्दांमधील ही अभिव्यक्ती मोलाची आहे."[६]

सावित्रीबाईंचे हे काव्य केशवसुतांच्या तीस वर्ष आधीचे आहे. केशवसुताईतकी त्यांचीकविता काव्यगुणांनी युक्त नसली, तरी मानवता, माणुसकी ही त्यांच्या काव्याची मूळ प्रेरणा आहे. त्यांची कविता समजून घेताना तत्कालीन परिस्थितीपहावी लागते. एका स्त्रीने स्वत:च्या मनातील भावनांना करून दिलेली ही काव्यरूपी वाट मोलाची आहे. आत्मपर, निसर्गवर्णन, सामाजिक जाणीवा इत्यादी विषय दोघांच्याही काव्यात सारखे आहेत. तसेच मानवतावादाची भूमिका केशवसुतांच्या कितीतरी वर्षे आधी सावित्रीबाईंनी मांडली असल्यामुळे डॉ.कृ.पं. देशपांडे यांच्या मते सावित्रीबाईंना अर्वाचीन मराठी कवितेचे जनक मानले गेले पाहिजे. ते म्हणतात, ''काळाच्या दृष्टीने सावित्रीबाईंचे काव्य पूर्वकालीन आहे. अनेक नव्या प्रवृत्ती, सौंदर्यवादाची काही वैशिष्ट्ये त्यांच्या काव्यात दिसत असल्याने त्यांना अर्वाचीन मराठी काव्याची जननी म्हणायला काहीच हरकत नाही.''[७] हे त्यांचे म्हणणे रास्त आहे. काळाच्या दृष्टीने विचार केला तर सावित्रीबाईंची कविता ही केशवसुतांच्या तीस वर्षे आधीची आहे. तसेच अनेक सामाजिक विषय केशवसुता प्रमाणे त्यांनी हाताळले आहेत. ज्या पद्धतीने मुकुंदराज यांना मराठी भाषेतील आद्य कवी म्हणून ओळखले जाते. त्याच पद्धतीने आधुनिक मराठी काव्याची सुरुवात सावित्रीबाई पासूनच होते. त्यामुळे खऱ्या अर्थाने सावित्रीबाई फुले यांच आधुनिक मराठी काव्याची जननी होत.

**निष्कर्ष :**

१) सामाजिक कार्याच्या बरोबरीनेच सावित्रीबाईंचे काव्यही मोलाचे आहे.

२) काळाच्या दृष्टीने सावित्रीबाईंचे काव्य हे केशवसुतांच्या आधीचे आहे.

३) मानवतावाद, आत्मपरता, सौंदर्य ही काही काव्याची वैशिष्ट्ये केशवसुत आणि सावित्रीबाई या दोघांच्याही काव्यात पाहायला मिळतात.

४) आधुनिक कवितेच्या जनक म्हणून सावित्रीबाई फुले यांनाच मानले गेले पाहिजे.

**संदर्भ —**

१) प्रा. नरके हरी— ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले, नाग — नालंदा प्रकाशन, इस्लामपूर. दु.आ. २००७, पृ.०७
२) देशपांडे कृ.पं.— अग्निफुले पृ.६१
३) उ.नि.पृ.७८
४) उगले जी.ए.— सावित्रीबाई फुले, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.दु.आ. २००९ पृ.७०
५) उ.नि.पृ.७४
६) उ.नि.पृ.७४
७) देशपांडे कृ.पं. अग्नीफुले पृ. ११९

❑❑❑

Shivaji College Hingoli
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)